दै. गोदातीर दि. ११-०४-२०२१

# देगलूर महाविद्योलयाची मनीषा वनजे लोकप्रशासन सेट परीक्षेत उत्तीर्ण

देगलूर- सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे यांच्यावतीने आयोजित केलेल्या सेट परीक्षेत देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागाची विद्यार्थिनी मनीषा वनंजे ही सेट परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. यापूर्वी तिने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदव्युत्तर वर्गाची गुणवत्ता यादीत सर्वप्रथम येवून महाविद्यालयाची गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.



एम. ए. लोकप्रशासन या वर्गात प्रथम आल्यामुळे विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्यत्व प्राप्त झाले आहे. प्रस्तुत विद्यार्थिनी यापूर्वी बी. ए. पदवी परीक्षेत देखील विद्यापीठ गुणवत्ता यादीत सर्वद्वितीय आली होती.

या यशाबद्दल वनंजे मनीषा व लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. बी. आर. कतुरवार व डॉ. एस. एम. देबडे यांचे आडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजूकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्रअप्पा घाडे, भगवान पाटील भायेगावकर, चंद्रकांत नारलावार, प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य डॉ. प्रकाश कद्रेकर, उपप्राचार्य निवृती गोविंदवार, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी अभिनंदन केले आहे.